**मानपाडा पोलीस ठाणे, डोंबिवली पुर्व**

पत्ता :– कल्याण शिळ रोड, एम.आय.डी.सी. डोंबिवली
पु. जि. ठाणे शहर, पिन ४२१०२१,
फोन नं. ०२५१–२४७०१०४,
Email ID - cp.thane.manpada@mahapolice.gov.in


## प्रेस नोट

दिनांक ०२/०४/२०२४

### " पोलीस दलात व आरोग्य विभागात नोकरी लावुन देतो असे सांगुन फसवणुक करणारे ठकास मानपाडा पोलीसा कडुन केले अटक "

मानपाडा पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं ५०७/२०२४ भादंवि कलम ४२०,४०६,४६५,४६८,४७१,१७० प्रमाणे, दाखल गुन्हयातील आरोपी नामे अरविंद अशोक निकम वय ३६ वर्षे रा. संजय म्हात्रे चाळ, चाळ नं २, रूम नं ०१, निलकमल बंगल्या समोर, उमेश नगर, डोंबिवली पश्चिम, याचे विरूध्द दाखल गुन्हयाचे अनुषंगाने यातील अटक आरोपी यांस तात्काळ ताब्यात घेवुन अटक करण्यात आली असताना यातील अटक आरोपी याने फिर्यादी यांना त्याचे जवळील पोलीस मित्र संघटना तसेच आरोग्य विभाग मंत्रालय मुंबई वरिष्ठ लिपिक पदाचे ओळखपत्र फिर्यादी यांना दाखवुन त्यांस त्यांचे भावास पोलीस दलात भरती करून देतो असे अमिष दाखवुन फिर्यादी यांचे कडुन ऑनलाईन गुगल पें अॅप्स व्द्ारे ८१,७००/– रू. तसेच ५५,०००/– रू. किंमतीचा मोबाईल फोन लोनवर घेवून त्यांना पोलीस दलात भरती करून देतो असे सांगुन त्यांची फसवणुक करून पोलीस दलात भरती न करता परस्पर फिर्यादी यांना त्याचे जवळील बनावट ओळखपत्र दाखवुन रक्कमेचा व मोबाईलचा अपहार करण्यात आला असल्याने सदर आरोपीत याचा तात्काळ शोध घेवुन त्यांस नमुद गुन्हयात अटक करण्यात आले असुन त्याचे कडे मा.वरिष्ठाचे मार्गदर्शना नुसार अधिक तपास चालु आहे.

सदरचा गुन्हा उघडकीस आणण्याच्या दृष्टीने मा. वरिष्ठांनी गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंमलदार यांना दिलेल्या सुचनांप्रमाणे तपास चालू केला. सदर गुन्हयात आरोपी यास ताब्यात घेवून त्याच्याकडे तांत्रिक पध्दतीने कसुन तपास करून आरोपीत नामे अरविंद अशोक निकम वय ३६ वर्षे रा. संजय म्हात्रे चाळ, चाळ नं २, रूम नं ०१, निलकमल बंगल्या समोर, उमेश नगर, डोंबिवली पश्चिम, त्याच्याकडुन फिर्यादी यांचे नावे लोनवर खरेदी करण्यात आलेला सॅमसंग कंपनीचा मोबाईल फोन ५५,०००/– रू. किंमतीचा मोबाईल हस्तगत करण्यात आला आहे. तसेच यातील अटक आरोपी यांने सदरचा गुन्हा करताना त्यांचे नावे असलेले पोलीस मित्र संघटना,महाराष्ट्र राज्याचे ओळखपत्र, व महाराष्ट्र शासन आरोग्य सेवा मंत्रालय मुंबई, आरोग्य विभाग पद वरिष्ठ लिपिक चे ओळखपत्र असे फिर्यादी व इतराना दाखवुन त्याआधारे फिर्यादी यांना पोलीस दलात तसेच आरोग्य विभाग मध्ये ओळख असल्याचे कारण सांगुन फिर्यादी व इतराची देखील फसवणुक करून त्यांना खोटे नोकरीचे अमिष दाखवुन फसवणुक करण्यात आली असुन सदर बाबत अधिक तपास सपोनि प्रशांत आंधळे नेम मानपाडा पोलीस ठाणे व टिम करत आहे.

**आरोपीत याने यापुर्वी देखील फसवणुकीचे गुन्हे केले असुन त्यामध्ये वरील आरोपीत यास अटक झालेली आहे. त्याचा गुन्हे पुर्व अभिलेख खालील प्रमाणे**

| आरोपीत अरविंद अशोक निकम याचा पुर्व गुन्हे अभिलेख | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र | पोलीस ठाणे | गुरनं | कलम |
| १ | एम.आर.ए मार्ग पोलीस स्टेशन, मुंबई | ३३९/२०१६ | भादंविक ४१९,४२०,४६५,४६८,४७१,५११ प्रमाणे |
| तसेच निगोशिएबन इन्स्ट्रयुमेंट ॲक्ट कलम १३८ अन्वये एकुण ०२ गुन्हे मा. न्यायालयात दाखल आहेत. | | | |

सदरची कामगिरी श्री. दत्तात्रय शिंदे, अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग कल्याण, मा. श्री. सचिन गुंजाळ, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३, कल्याण व मा. श्री. सुनिल कुराडे सहाय्यक पोलीस आयुक्त, डोंबिवली विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. विजय कादबाने वपोनि, मानपाडा पोलीस ठाणे यांच्या देखरेखीखाली श्री. दत्तात्रय गुंड पोनि (प्रशासन), श्री. राम चोपडे पोनि (गुन्हे), सपोनि. प्रशांत आंधळे, सपोनि. संपत फडोळ, सपोनि.

महेश राळेभात, सपोउपनिरी. भानुदास काटकर, पोहवा/सुनिल पवार, पोहवा./संजु मासाळ, पोहवा./विकास माळी, पोहवा./शिरीष पाटील, पोहवा./राजेंद्र खिलारे, पोहवा/दिपक गडगे, पोहवा./सोमनाथ ठिकेकर, पोना./यलप्पा पाटील, पोना./देवा पवार, पोना./गणेश भोईर, पोना./शांताराम कसबे, पोना./प्रविण किनरे, पोना./अनिल घुगे, पोना/चिंतामण कातकडे, पोशि./अशोक आहेर, पोशि./विजय आव्हाड, पोशि./महेंद्र मंजा, पोशि./नाना चव्हाण, पोशि/गणेश बडे यांचे पथकाने केलेली आहे.

**वरील पत्रकार परिषदेच्या अनुषंगाने नागरिकांना याद्वारे आवाहन करण्यात येते की, नोकरीस लावून देणे बाबतच्या आमिषाला बळी न पडता वरील अशायानुसार अन्य कुणाची फसवणुक झाली असल्यास त्याबाबत मानपाडा पोलीस ठाणे येथे तक्रार देण्याकरीता संपर्क करावा.**